# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**डोंबिवली (जि.ठाणे) येथील पश्चिमेकडील देसाई गावानजीक सीआरझेड क्षेत्रात अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणावर भरणी करुन कच्चा रस्ता बनविल्याबाबत**

**(१) २४१७० (३१-०७-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील पश्चिमेकडील देसाई गावानजीकच्या देसाई पुलाच्या भिवंडीकडील भागात सीआरझेड क्षेत्रातच अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणावर भरणी करुन कच्चा रस्ता बनविण्यात आला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंदाजे ७०० ते ८०० मीटरचा सदर रस्ता देसाई खाडीत बनविण्यात आला असून मागील अनेक महिने होत असलेल्या या भरणीप्रकरणी कोणावरही कारवाई झालेली नाही तसेच पावसाळ्यात या भरणीमुळे भरतीच्या काळात नागरी वस्तीमध्ये पाणी घुसण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१८) :** (१), (२), (३) व (४) होय.

प्रश्नाधिन देसाई खाडीमध्ये भराव करून रस्ता बनविल्याप्रकरणी संबंधित व्यक्ती श्री.विश्वास दुनकर पाटील यांनी खाडीमध्ये भराव केल्याबाबत त्यांचे विरूध्द तहसिलदार कल्याण यांचे कार्यालयाकडून मानपाडा पोलीस स्टेशनमध्ये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८(७) व पर्यावरण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच सदरचा रस्ता ठिकठिकाणी जे.सी.बी. यंत्राच्या सहाय्याने खोदून बंद करण्यात आला असून सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून नियमानुसार चौकशी करून कार्यवाही करण्यात आलेली आहे.

---

**राज्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील योजनांमध्ये होत असलेला गैरव्यवहार**

**(२) ३५०२१ (१४-०१-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरी आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासनाच्या शेकडो योजना असून त्यापैकी महत्वाच्या ४० योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत असून लाच दिल्याशिवाय कामेच होत नसल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गत दोन वर्षात घेतलेल्या आढाव्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत दोन वर्षात कल्याणकारी योजनांशी संबंधित १३६ अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई झाली असून रोजगार हमी योजना गैरव्यवहार पहिल्या क्रमांकावर असून या विभागात २७ लाचखोर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इंदिरा आवास योजनेमध्ये १९, घरकुल योजनेमध्ये १४ जणांवर कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विविध कल्याणकारी योजनेत होत असलेला गैरव्यवहार रोखण्यासाठी शासनाने कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत व त्याची फलनिष्पत्ती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१८) :** (१), (२) व (३) राज्यात गेल्या दोन वर्षात कल्याणकारी योजनेसंबधी १४४ सापळा प्रकरणीमध्ये एकुण १९० आरोपी लोकसेवकांवर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमातील तरतुदी नुसार कारवाई केली आहे. यापैकी रोजगार हमी योजनेशी संबंधीत ४६ आरोपीलोकसेवक तसेच इंदिरा आवास व घरकुल योजने संबंधी ४० आरोपी लोकसेवक आहेत.

(४) राज्यातील लाचखोरीला आळा बसवण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग प्रयत्नशील असून सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालय/विभागात भ्रष्टाचार होणार नाही यासाठी वेळोवेळी सुचना देण्यात आल्या आहेत. भ्रष्टाचाराच्या प्रकरणी लोकसेवकाचा सहभाग आढळल्यास भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नुसार कारवाई केली जाते याशिवाय लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत मोबाईल ॲप, टोल फ्री.क्रं. १०६४, ही हेल्पलाईन, ९९३०९९७७०० हा WhatSapp नंबर तसेच Facebook page प्रसिध्दकरून जन जागृती करण्यात येते. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या संकेतस्थळावरून सामान्य जनतेसाठी सर्व माहिती उपलब्ध केली जात आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय कार्यालयात जावून भेटी देवून माहिती देत असतात व त्यांच्या कार्यक्षेत्रातील आठवडे बाजार, एसटी स्टॅण्ड, रेल्वेस्टेशन, कॉलेज इत्यादी ठिकाणी जाऊन सुध्दा जनजागृती करत असतात. तसेच शासकिय कार्यालयाच्या दर्शनी भागावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाबाबत माहिती प्रसिध्द केली जाते.

___________

**तळवडे (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील माध्यमिक शाळेत शालेय पोषण आहाराच्या पुरवठयात अनियमितता झाल्याबाबत**

**(३) ४८४०५ (१६-०५-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळवडे (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील माध्यमिक शाळेमध्ये मुलांच्या पोषण आहारासाठी आलेला १ हजार ४५० किलो तांदळाचा साठा आहारासाठी न देता विक्रीसाठी काढल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अनियमिततेस जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१८) :** (१), (२) व (३) संस्थेच्या अंतर्गत वादामुळे उद्भवलेल्या प्रकरणाबाबत शासनाने दि. २३/०५/२०१८ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

१) संस्था बरखास्त करुन प्रशासक नियुक्त करण्यात यावा.

२) शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी तात्काळ सुरु करण्यात यावी.

३) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत झालेल्या अनियमिततेबाबत शिक्षण संचालक (प्राथ.) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिठी नदी प्रकल्पांतर्गत दीड ते दोन लाख प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(४) ५०७६२ (१३-०५-२०१६). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशीनाका, चेंबूर येथील एमएमआरडीएच्या वसाहतीत सन २००४ साली एमयुआयपी, एमसयुआयपी मिठी नदी प्रकल्पांतर्गत कायमस्वरुपी चेंबूर, ठाणे, दहिसर, मुलुंड, पोयसर, सांताक्रुझ येथील दीड ते दोन लाख प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकल्पात शासनाच्या पुर्नवसाहत व पुनर्वसनात केलेल्या सुधारणेनुसार नागरिकांना विविध सुविधा पुरविण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकल्पात नागरिकांना विविध सोईसुविधा तातडीने पुरविण्यात याव्यात, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ जानेवारी, २०१४ रोजी मा.मुख्यमंत्री यांचेकडे पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

सन २००४-०५ पासून वाशीनाका येथील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या पुनर्वसन वसाहतीमधील सदनिका/गाळ्यांमध्ये एमयुआयपी, एमयुटीपी व मिठी नदी विकास बाधित प्रकल्पाने बाधित सुमारे ८००० प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात आले आहे.

(२), ते (५) प्रश्नाधीन वसाहतींच्या नियोजनास व विकासास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मान्यता दिली असून यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नियोजन प्राधिकरण म्हणून देखिल काम पहाते. यासंदर्भातील नियमानुसार वसाहतीमधील रस्ते, पाणीपुरवठा, गटारे, मलनि:सारण यासारख्या पायाभुत सुविधा पुरविण्यात येतात.

वाशीनाका परिसरात शैक्षणिक सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने रॉकलाईन, दिवान आणि कुकरेजा येथील तीन शाळा चालविण्यासाठी वसाहतीमधील सुमारे ७० सदनिका/गाळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत उपलब्ध करुन दिले आहेत. याच परिसरात गरजू प्रकल्पग्रस्तांना उपजिविकेचे साधन उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने १५ शेडस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने बांधून दिल्या आहेत.

तसेच बृहन्मुंबई महापालिकेमार्फत पुनर्वसन इमारतींमध्ये पाण्याची व स्वच्छतेची सुविधा पुरविण्यात येते. तसेच परिसरातील रस्ते व गटारांची दुरुस्ती वेळोवेळी बृहन्मुंबई महापालिकेतर्फे करण्यात येते.

चेंबूर (मुंबई) आणिक-पांजरपोळ जोडरस्ता (पूर्व मुक्तमार्ग) रस्त्याचे काम करतांना प्रकल्पबाधित पुनर्वसन केलेल्या व पुनर्वसन न झालेल्या झोपडीधारकांसंदर्भात मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांना वाशीनाका येथील एमएमआरडीए वसाहतीकरिता विशेष मोहिम आखून स्वच्छता करुन घ्यावी तसेच नागरी सुविधांबाबत देखभाल दुरुस्ती करुन घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

---

## कोल्हापूर जिल्हयातील चौथीच्या मुलांना गुणवत्त्तेनुसार शिष्यवृत्त्तीची रक्कम देण्यात आली नसल्याबाबत

**(५) ६७८९१ (०२-०१-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील चौथीच्या हुशार मुलांना परिक्षेतील गुणवत्त्तेनुसार शिष्यवृत्त्ती जाहिर करुन चार वर्षे उलटले तरी शिष्यवृत्त्तीची रक्कम अदा करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शिष्यवृत्त्तीकरिता विद्यार्थी व त्यांचे पालक हे सतत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या शिक्षण विभागात वारंवार विचारणा करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त मुलांना शिष्यवृत्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१८) :** (१) व (२) नाही.
(३) ग्रामीण भागातील प्राथमिक (इ. ४ थीच्या) हुशार मुलांना गुणवत्तेनुसार शिष्यवृत्ती मिळणा-या विद्यार्थ्यांखेरीज गुणानुक्रमे येणा-या ७६ विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद स्वनिधीतून शिष्यवृत्ती दिली जाते. त्यानुसार पात्र विद्यार्थ्यांना गटपातळीवर गटशिक्षणाधिकारी यांचे मार्फत शाळानिहाय देयक पारीत करुन शाळेमार्फत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुर्तीजापूर शहरात (जि.अकोला) एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाअंतर्गत घरकुल मिळण्याबाबत

**(६) ७३९०१ (२०-०४-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुर्तीजापूर (जि.अकोला) शहर एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाअंतर्गत घरकुल मिळण्याबाबत दिनांक २७ जानेवारी, २०१५ व ०९ फेब्रुवारी, २०१५ रोजी अपंग, विधवा, परिपक्त्या, दुर्बल व घटस्फोटीत महिलांनी घरकूल मिळण्याबाबत अर्ज केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती लाभार्थ्यांना घरकूल देण्यात आले आहेत तसेच या संवर्गातील लाभार्थ्यांना घरकूलांचे वाटप न करता इतरांना घरकूलांचे वाटप करण्यात आले आल्याची तक्रार तेथील एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास मुख्याधिकारी, मुर्तीजापूर नगरपरिषद यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१०-०७-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) केंद्र पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम मुर्तिजापूर नगरपरिषदेकरिता खालील प्रमाणे २ टप्प्यात मंजूर करण्यात आलेला आहे.

| टप्पा क्र. | मंजुर घरकुले | प्रगती पथावरील घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | काम सुरु न झालेली घरकुले |
|---|---|---|---|---|
| १ | १००३ | १६४ | ८३९ | ० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | ६२० | ० | ६२० | ० |
| एकूण | १६२३ | १६४ | १४५९ | ० |

सदर मंजूर डीपीआर मध्ये महाराष्ट्र शासन आणि केंद्र शासनाने मंजूर केलेल्या लाभार्थ्यांच्या यादीप्रमाणे लाभार्थ्यांना घरकुल व बाहय सुविधांचा लाभ देण्यात आलेला आहेत. तसेच केंद्र शासनाच्या मंजूर यादी व्यतिरिक्त इतर कोणत्याही लाभार्थ्यांना घरकुलाचे वाटप करण्यात आले नाही.

(४) निरंक.

---

**पंतप्रधान आवास योजनेतून कोकण म्हाडा ने आर्थिकदृष्टया दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटाकरीता घरे बांधण्याचा घेतलेला निर्णय**

**(७) ७४१४५ (२०-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वासाठी घरे या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या पंतप्रधान आवास योजनेतून कोकण म्हाडा ने आर्थिकदृष्टया दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटाकरीता घरे बांधण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण म्हाडामार्फत कोणकोणत्या शहरात सदरहू घरे बांधण्यात येणार आहे,

(३) तसेच या गृह प्रकल्प योजनेस केव्हापासून सुरुवात केली जाणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१२-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कोकण मंडळातर्फे ठाणे जिल्हयातील खोणी, शिरढोण ता.कल्याण, स.क्र.८०-८१ भंडार्ली, स.क्र.१३ भंडार्ली, गोठेघर तसेच पालघर जिल्हयातील बोंळीज-विरार व रायगड जिल्हयातील वावे ता.कर्जत येथे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत अत्यल्प/अल्प उत्पन्न गटाकरिता सदनिका बांधण्यात येणार आहेत.

(३) ठाणे जिल्हयातील म्हाडास ताबा मिळालेल्या ५ जमिनीवरील योजनांकरिता निविदा मागवून ठेकेदारास कार्यादेश देण्यात आले आहेत. शिरढोण व खोणी येथील सदनिकांचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरीत स.क्र.८०-८१ भंडार्ली, स.क्र.१३ भंडार्ली व गोठेघर येथील योजनांच्या नकाशास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्षात कामास सुरुवात करण्यात येणार आहे. तसेच बोंळीज-विरार व वावे या ठिकाणावरील कामांच्या निविदा मागविण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील भेंडाळा, मंगसा, खानगाव, आंजनी, शेरडी, सालई येथील शिवारांत पिक असताना सुध्दा पॉवरग्रीड कंपनीने टॉवरलाइन उभारणी केल्याबाबत**

**(८) ८११९० (२८-११-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील भेंडाळा, मंगसा, खानगाव, आंजनी, शेरडी, सालई येथील शिवारांत पिक असताना सुध्दा शेतकऱ्यांच्या पिकांची पर्वा न करता पॉवरग्रीड कंपनीने टॉवरलाइन उभारणीकरीता ट्रक, ट्रॅक्टर इ. साहित्य आणून शेतकऱ्यांना धमकावून टॉवर उभारणीचे काम करीत असल्याची माहिती दिनांक १० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पॉवरग्रीड कंपनीचे अधिकारी हे शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा मोबदला देत नसून संबधित शेतकऱ्यांच्या घरी जावून त्यांना शासकीय कामात अडथळा निर्माण करीत असल्याचे कारण दाखवत धमकावत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचा तपशिल काय आहे,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (भारत सरकार उपक्रम) मार्फत ४०० के.व्ही. डी/सी मौदा-बैतुल पारेषण वाहिनी उभारण्यात येत आहे. सदर पारेषण वाहिनी नागपूर जिल्हयातील भेंडाळा, मंगसा, खानगाव, आंजनी, शेरडी, सालई व अन्य गावातून जात आहे. या वाहिनीस वीज अधिनियम २००३ च्या कलम ६८ अन्वये केंद्र शासनाने परवानगी दिली आहे.

(२) हे खरे नाही. वाहिनी उभारण्याच्या कामाच्या दरम्यान वृक्ष व पिकांचे होणारे नुकसानीचे मुल्यांकन संबंधित कृषि अधिकारी, तहसीलदार यांच्याकडून करण्यात येते व त्याचा मोबदला नुकसानग्रस्त शेतकरी /जमिनधारक यांना प्रचलित शासन निर्णयानुसार अदा करण्यात येतो.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठाने फी वाढीचा घेतलेला निर्णय**

**(९) ९५२५५ (२९-१२-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने अचानक शुल्क वाढीचा निर्णय घेतल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तणाव निर्माण झाला असून दुप्पटीने वाढलेली परीक्षा शुल्क कमी वेळेत भरण्याबाबतचा प्रश्न विद्यार्थ्यां समोर निर्माण झाल्याचे माहे सप्टेंबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई विदयापीठाच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परिक्षा व फेरपरिक्षांच्या शुल्कात दुप्पटीपेक्षा जास्त प्रमाणात वाढ करण्यात आलेली असून उक्त परिक्षा शुल्क ६५० रुपयांवरुन १५६० रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने ही वाढ आर्थिकदुष्टया दुर्बल घटकातील विदयार्थ्यांसह सर्वच विदयार्थ्यांना परवडणारी नसल्यामुळे त्याचा फेरविचार करुन सदरची शुल्कवाढ कमी करावी अशी विदयार्थी व पालकांनी मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, विद्यापीठाकडून महिनाभर आधी शुल्क वाढीबाबत परिपत्रक पाठविण्यात आले असले तरी ही वाढीव परीक्षा शुल्क विद्यार्थ्यांकडून जमा करायला काही महाविद्यालयांनी सुरुवात केल्यामुळे विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उपरोक्त शुल्क वाढ अन्यायकारक व गरीब विदयार्थ्यांवर आर्थिक भार टाकणारी असल्यामुळे याचा फेरविचार करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) विद्यापीठ हिताचा विचार करुन सदर दरवाढीचा संपुर्णपणे भार विद्यार्थ्यांवर पडता कामा नये. यासाठी विद्यापीठाने दि. २५ ऑक्टोबर, २०१७ रोजी अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन पुढीलप्रमाणे परीक्षा शुल्कात कपात करण्याबाबत शिफारस केली आहे.

| No. of Subjects | Old Fee for UG | Reduction in (%) for UG | New Fee for UG |
|---|---|---|---|
| १ | १००० | ८०% | २०० |
| २ | १००० | ६०% | ४०० |
| ३ or more & Fresh Student | १००० | १०% | ९०० |

| No. of Subjects | Old Fee for PG | Reduction in (%) for PG | New Fee for PG |
|---|---|---|---|
| १ | १५०० | ७७% | ४०० |
| २ | १५०० | ५३% | ७०० |
| ३ or more & Fresh Student | १५०० | १०% | १३५० |

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरात बांधकाम व्यावसायिक आणि ठेकेदारांकडून कामगारांच्या सुरक्षेबाबत हलगर्जीपणा होत असल्याबाबत

**(१०) ९५३६६ (०६-०१-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात बांधकाम व्यावसायिक आणि ठेकेदारांकडून कामगारांच्या सुरक्षेबाबत हलगर्जीपणा होत असल्याने निष्पाप कामगारांच्या मृत्यूमध्ये लक्षणीय वाढ झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालेवाडी पुणे परिसरात दिनांक २९ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास प्राइड पर्पलच्या पार्क एक्स्प्रेस इमारतीचा स्लॅब कोसळून नऊ कामगारांचा मृत्यू झाला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दुर्घटनेतील प्राइड पर्पल प्रॉपर्टीजचे आर्किटेक्ट आयडिया अँड इमेजेसचे प्रदीप कोसुंबीकर यांची महापालिकेकडील नोंदणी रद्द करण्यात आल्यानंतरही कोसुंबीकर पुणे, सिंहगड रस्त्यावरील एका इमारतीचे नोंदणीकृत आर्किटेक्ट म्हणून काम पाहत असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांच्या अनुषंगाने तसेच कामगारांच्या सुरक्षेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०९-०७-२०१८) :** (१) सन २०१६ मध्ये ६ व २०१७ मध्ये २७ अपघाताची प्रकरणे नोंदवली आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) (अ) इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार) नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील कलम ३८ ते ४९ व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ मधील नियम, ६१ ते २२६ मध्ये बांधकाम कामगारांच्या आरोग्य व सुरक्षेबाबत केलेल्या तरतुदीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येते.

(ब) शासनाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना सुरक्षा संच पुरविण्याच्या योजनेस दिनांक २३ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दहिसर पश्चिम (मुंबई) येथील स्कायवॉक वर मोठया प्रमाणावर खड्डे पडले असल्याबाबत**

**(११) १०२१०५ (०३-०१-२०१८). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहिसर पश्चिम (मुंबई) येथील स्कायवॉक वर मोठया प्रमाणावर खड्डे पडले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खड्डयांमुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असून नागरीकांना स्कायवॉकवरुन प्रवास करणे धोकादायक बनले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तातडीने सदर स्कायवॉक वरील खड्डे बुजविण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१८) :** (१) दहिसर पश्चिम येथील स्कायवॉकवर माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये दोन ठिकाणी खड्डे पडल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) सदर स्कायवॉक नागरिकांच्या सुरक्षेकरिता बंद करण्यात आला आहे.
(३) व (४) सदर स्कायवॉक एम.एम.आर.डी.ए. मार्फत बांधण्यात आला असून बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आला आहे.

त्यामुळे महानगरपालिकेने तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करुन सदर स्कायवॉकच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार केले आहे.

सदर स्कायवॉकसाठी निविदा बनविण्याचे काम सुरु असून, पुढील कार्यवाही प्राधान्याने करण्यात येत आहे.

---

**भुसावळ (ता.भुसावळ,जि.जळगाव) ऑडीटोरियमच्या बांधकामासाठी निधी मिळण्याबाबत**

**(१२) १०४८९४ (२८-०३-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ (जि.जळगाव) तालुक्यातील भुसावळ ऑडीटोरियमसाठी जागा आरक्षित करुन ५ वर्षे झाल्यानंतरही पुरेसा निधी नसल्याने त्याचे बांधकाम अद्यापपर्यंत झाले नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.वित्त मंत्री यांना दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास पत्र देवून निधीची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) दिनांक २० नोव्हेंबर,२०१७ च्या शासन निर्णयानुसार वैशिष्टयपूर्ण योजनेअंतर्गत रु.३.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्री. एस. के. तरवडे (भापेसे) यांच्यावर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाची चौकशीबाबत**

**(१३) १०५०८२ (०७-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री.एस.के. तरवडे (भापेसे) यांच्यावर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाची चौकशी पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१८) :** (१), (२) व (३) श्री. एस.के.तरवडे (भापोसे) यांच्याविरूध्द दिनांक १२.०३.२०१३ च्या ज्ञापनान्वये दोषारोप बजाविण्यात येवून विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. श्री. तरवडे, भापोसे यांच्यावर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाची चौकशी करण्यासाठी दिनांक १७.०९.२०१३ च्या आदेशान्वये “प्रधान सचिव तथा विशेष चौकशी अधिकारी-१, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२” यांची “चौकशी अधिकारी” म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. चौकशी अधिकारी यांच्याकडून चौकशी अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

---

**ऐरोली (नवी मुंबई) एमआयडीसी परिसरात स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करणेबाबत**

**(१४) १०५३२४ (०५-०४-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहराची लोकसंख्या १४ लाखांच्यावर असतांना तसेच येथे एमआयडीसी, मिलिनियम बिझनेस क्षेत्र असून एवढ्या मोठ्या विभागासाठी बेलापूर येथे एकच औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेलापूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सर्वच विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नसल्यामुळे त्यांना अपेक्षित ट्रेड मधून शिक्षण घेता येत नाही त्यामुळे बेरोजगारीची समस्या वाढली आहे यासाठी ऐरोली एमआयडीसी परिसरात स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनस्तरावरून अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) ऐरोली येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव संचालनालयाने शासनास सादर केला आहे. प्रस्तुत प्रस्तावांतर्गत पदनिर्मिती, यंत्रसामुग्री खरेदी, बांधकाम इत्यादीचा समावेश आहे. राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील असंलग्न व बंद होणाऱ्या अभ्यासक्रमांच्या तुकडयांची यंत्रसामुग्री वर्ग करण्याबाबत समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशी शासनास प्राप्त झालेल्या असून या शिफारशींवर धोरणात्मक निर्णय झाल्यानंतरच नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यासंदर्भात कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील क्रिडापटूंना क्रिडा पुरस्कार प्रदान करण्याबाबत

**(१५) १०५६७० (०६-०४-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील क्रीडा क्षेत्रात अव्वल कामगिरी करणाऱ्या क्रिडापटूंना दरवर्षी विविध क्रिडा पुरस्कार प्रदान करण्याचे शासनाचे धोरण ठरलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ या तीन वर्षासाठी क्रीडा पुरस्कार क्रिडापटूंना प्रदान करण्यात आले नसल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातून जीवन गौरव पुरस्कारासह विविध क्रीडा पुरस्कारासाठी ७७५ अर्ज शासनाकडे प्राप्त झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गत तीन वर्षे क्रिडा पुरस्कार प्रदान न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार प्रलंबित क्रीडा पुरस्काराचे प्रदान करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा त्याबाबतचे नियोजन काय आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०६-२०१८) :** (१), (२) व (३) होय. महाराष्ट्र राज्यातील नामवंत सर्वोत्कृष्ट क्रीडा महर्षी, क्रीडापटू, क्रीडा कार्यकर्ते-संघटक, क्रीडा मार्गदर्शक, साहसी क्रीडापटू आणि दिव्यांग खेळाडूंना दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ च्या सुधारित नियमावलीनुसार शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार व अन्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतात. यानुसार जीवनगौरव पुरस्कारासह इतर पुरस्कार मिळण्याकरिता प्राप्त ऑनलाईन अर्जांची शासन निर्णयातील तरतुदीनुसार छाननी करुन दरवर्षी पुरस्कार वितरीत करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.
(४) व (५) शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारर्थींची निवड प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यासाठी शासनाने प्रथमच या पुरस्कारांची प्रक्रिया ऑनलाईन प्रणालीद्वारे पार पाडली आहे. तसेच याबाबत शासनास प्राप्त सर्व तक्रार अर्जांची छाननी करुन अंतिम निवड करण्यात आलेल्या पुरस्कारर्थींना शिवजयंतीचे औचित्य साधून दिनांक १७ फेब्रुवारी, २०१८ रोजी शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार व अन्य क्रीडा पुरस्कार वितरीत करण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहराच्या प्राधिकरण विकास आराखडयाबाबत**

**(१६) १०५७१७ (१८-०४-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने कोल्हापूर महानगरपालिका हद्दवाढी ऐवजी प्राधिकरण विकास आराखड्याची घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अध्यादेश काढून चार महिन्यांचा कालावधी होऊनही अद्यापपर्यंत शहरामध्ये प्राधिकरणाचे कार्यालयही सुरु केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहर प्राधिकरणामध्ये ४२ गावांचा समावेश असल्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी नगरविकास विभागाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोल्हापूर प्राधिकरण विकास आराखडयाचे प्रत्यक्ष काम सुरु होणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे व यासाठी लागणारा कालावधी किती आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१८) :** (१) शासनाने दि. १६/०८/२०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणाची स्थापना केली आहे.
(२) हे खरे नाही. कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणाचे कार्यालय जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचे कार्यालयामध्ये कार्यान्वित करण्यात आले आहे.
(३) हे खरे आहे.
(४) कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणाचे प्रत्यक्ष कामकाज सुरु झाले आहे .
(५) विलंब झालेला नाही.

---

### मुंबईत मेट्रोच्या कामामुळे मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

**(१७) १०६४०७ (१८-०४-२०१८). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत सध्या मेट्रोच्या कामामुळे मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून मुंबईकरांना कार्यालयात जाण्यास उशीर होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे बीकेसी व परिसरात कामासाठी येणा-या सुमारे ४ लाख कर्मचा-यांच्या कार्यालयीन वेळा बदलण्याचा प्रस्ताव एमएमआरडीएने येथील सरकारी तसेच खासगी कंपन्यासमोर ठेवला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रस्तावाला सरकारी व खासगी कंपन्यांनी मान्यता द्यावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०१८) :** (१), (२), (३) व (४) मुंबईमध्ये मेट्रो मार्गाच्या सुरु असलेल्या स्थापत्य कामामुळे काही ठिकाणी वाहतुक कोंडी होते. सदर वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी वाहतूक व्यवस्थापन योजना तयार करण्यात आली असून सदर योजनेची अंमलबजावणी वाहतूक पोलीस, परिवहन सहाय्यक यांच्यामार्फत करण्यात येत असून यामुळे वाहतूक समस्येमुळे होणाऱ्या प्रवाशांच्या गैरसोयीचे निराकरण होईल. प्रश्नामध्ये नमूद असल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत कोणताही प्रस्ताव सरकारी आणि खाजगी कंपन्यांसमोर ठेवण्यात आलेला नाही.

---

**नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील मुळा कारखान्याच्या भागधारक सभासदांना ऊस नोंद लागवड व ऊस तोड देण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(१८) १०७९१४ (१७-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील मुळा कारखान्याच्या भागधारक सभासद असूनही केवळ राजकीय विरोधक म्हणून ऊस नोंद लागवड व ऊस तोड देण्यास जाणीवपर्वक विलंब होत असल्याची तक्रार साखर आयुक्तांकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान भानसहिवरा येथील ग्रामस्थांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व चौकशीनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०९-०७-२०१८) :** (१) नेवासा तालुक्यातील (जि.अहमदनगर) मुळा कारखान्याच्या विरोधात भानसहिवरा येथील ग्रामस्थांची तक्रार साखर आयुक्त कार्यालयास प्राप्त झालेली नाही. परंतू, अशा स्वरुपाच्या अन्य तक्रारी साखर आयुक्त कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत.

(२) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मुळा साखर कारखान्याची रितसर चौकशी करण्यासाठी दि.१३.०४.२०१८ च्या आदेशान्वये प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर यांच्या अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय समिती नियुक्त केलेली असून चौकशीचे कामकाज सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्री.प्रदीप भालेकर यांनी केलेल्या तक्रारीनुसार गोरेगाव फिल्मसिटीत गैरकारभार सुरू असल्याबाबत**

**(१९) १०८३२५ (१२-०४-२०१८). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव फिल्मसिटीत सुरु असलेल्या गैरकारभाराची तातडीने चौकशी करण्याबाबत लेखी विनंती श्री.प्रदीप भालेकर यांनी मा.मुख्यमंत्री, लोकायुक्त तसेच लाचलूचपत प्रतिबंधक विभाग आदींकडे केल्याची बाब दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रदीप भालेकर यांनी पुराव्यानिशी केलेल्या तक्रारीमध्ये प्रमुख तक्रारी किती व कोणत्या आहेत,

(३) असल्यास, याबाबत तपास केला आहे काय, तपासाचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१८) :** (१) श्री.प्रदीप भालेकर यांचा दिनांक २०.०३.२०१७ रोजीचा तक्रार अर्ज पोलीस अधीक्षक, सी.बी.आय., बांद्रा मुंबई, यांच्याकडून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांना दि. ०७.०४.२०१७ रोजी प्राप्त झाला.

(२) श्री.प्रदीप भालेकर यांच्या दिनांक २०.०३.२०१७ रोजीच्या अर्जात गोरेगांव चित्रनगरी मध्ये बांधकामातील भ्रष्टाचार, पदभरती, पदोन्नती प्रक्रिया, निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता, चित्रीकरणाची नोंद न करणे व देयक न देणे इत्यादीबाबतीत गोरेगांव चित्रनगरीचे व्यवस्थापकिय संस्थापक व इतर अधिकारी यांनी अनियमितता व भ्रष्टाचार केला असल्याबाबत तक्रार केली आहे.

(३) व (४) सदर अर्जातील आक्षेप सार्वजनीक बांधकाम विभागाशी संबंधीत असल्याने तक्रारदार यांचा मुळ अर्ज अवश्यक कार्यवाहीसाठी दि. २२.०५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सार्वजनीक बांधकाम विभागास पाठविला आहे. तसेच या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संबंधीत मुदे आढळल्यास तसे लाचलुचपत प्रतिबंधक विभागास अवगत करण्याबाबत त्यांना कळविले आहे.तसेच सदर अर्जाची छायांकीत प्रत उचित कार्यवाहीसाठी मा. संचालक (प्रशासन) दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगांव पुर्व मुंबई यांना पाठविली आहे.

---

## नागपूर येथील मेट्रो रेल्वेच्या पदभरतीमध्ये महाराष्ट्राचे रहिवासी प्रमाणपत्राची अट वगळण्यात आल्याबाबत

**(२०) १०८३७८ (१९-०४-२०१८). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात मेट्रो वाहतुक सुरु होत असुन याकरिता पदभरती प्रकिया सुरु झालेली असुन याकरिता जाहिरातीप्रमाणे रहिवासी प्रमाणपत्राची अट वगळण्यात आली आहे, महाराष्ट्रातील सेवेकरिता ही पदभरती असल्यामुळे महाराष्ट्राचे रहिवासी प्रमाणपत्र असणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु जाहिरातीमध्ये रहिवासी प्रमाणपत्र तथा मराठी भाषा उत्तीर्ण असल्याची अट नमुद केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशाप्रकारे अट वगळण्यात आल्यामुळे राज्याबाहेरील लोकांचा लोंढा पदभरतीकरिता येवून महाराष्ट्रातील बेरोजगारांवर अन्याय होणार, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१८) :**(१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड (महामेट्रो) ही विशेष हेतू वहन कंपनी आहे. सदर कंपनी ही केंद्रशासन व महाराष्ट्र शासनाची ५०:५० समभाग असलेली संयुक्त भागीदारी कंपनी असून सदर प्रकल्प केंद्रशासनाच्या अखत्यारित आहे. भारत सरकार, महाराष्ट्र शासन व महामेट्रो यांच्या दरम्यान झालेल्या त्रिपक्षीय करारानुसार केंद्रशासनाच्या नियमांचे पालन करणे सदर कंपनीस आवश्यक आहे.

केंद्र शासनाच्या नियमानुसार विभिन्न पदांसाठी अर्ज करण्याकरिता उमेदवार भारतीय नागरीक असणे आवश्यक आहे व त्यासाठी एका विशिष्ठ राज्याचे रहिवास प्रमाणपत्राचे कुठलेही बंधन नाही. तथापि, क्षेत्राची मागणी लक्षात घेता, पर्यवेक्षीय व अपर्यवेक्षीय पदांकरीता महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडमध्ये जी भरती करण्यात येणार आहे त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील रहिवास व मराठी भाषेचे ज्ञान या दोन्ही गाष्टी नमूद केल्या आहेत.

अपर्यवेक्षीय पदाकरीता मराठी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे अनिवार्य आहे. त्याकरीता महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडकडून घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन मराठी लेखी चाचणीत किमान उत्तीर्ण होणे आवश्यक असून ज्या उमेदवाराजवळ महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र आहे व ज्याला मराठी भाषेचे ज्ञान आहे अशा उमेदवारांना त्याचा लाभ होणार आहे. तसेच पर्यवेक्षीय पदाकरीता सुध्दा मराठी भाषा लिहिता, वाचता तथा बोलता येणे अनिवार्य असून लेखी ऑनलाईन मराठी चाचणीत किमान उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा, त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. याचा लाभ मराठी भाषेचे ज्ञान असणाऱ्या उमेदवारांना होणार आहे.

---

**मुंबई विद्यापीठाच्या, ऑनलाईन मुल्यांकन गैरव्यवहारा प्रकरणाची चौकशी करण्यासाठी गठित केलेल्या समितीच्या अहवालाबाबत**

**(२१) १०९६४२ (०५-०४-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या ऑनलाईन मुल्यांकन गैरव्यवहार प्रकरणातील कुलगुरुसह दोषी सबंधित अधिकारी यांचे विरुध्द फौजदारी कारवाई करण्याबाबत दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्य सुमारास माहिती आणि तंत्रज्ञान सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या चौकशी समितीने शासनास अहवाल सादर केला आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषी विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१८) :** (१) मुंबई विद्यापीठाच्या ऑनलाईन मुल्यांकनाबाबत ज्या काही तांत्रिक चूका झाल्या त्याबाबत चौकशी करण्यासाठी श्री एस.व्ही.आर. श्रीनिवास, प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(२) ऑन स्क्रीन मार्कींगमध्ये झालेल्या विलंबाच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी शासनाने गठीत केलेल्या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर याबाबत योग्य ती कारवाई करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चितेगांव (जि.औरंगाबाद) येथील व्हिडीओकॉन कंपनीतील शेकडो कर्मचा-यांना कंपनी प्रशासनाने सक्तीच्या रजेवर पाठविल्याबाबत**

**(२२) १०९९४९ (१४-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चितेगांव (जि.औरंगाबाद) येथील व्हिडीओकॉन कंपनीतील शेकडो कर्मचा-यांना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान पासून कंपनी प्रशासनाने सक्तीच्या रजेवर पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सक्तीच्या रजेवर पाठविताना याचा कोणताही उल्लेख रजेच्या आदेशामध्ये न करण्यामागचे कारणे काय आहेत,

(३) असल्यास, कंपनीतील शेकडो कर्मचा-यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार प्रस्तुत प्रकरणी कंपनी प्रशासन दोषी असल्यास कंपनी प्रशासनावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०७-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) व्हिडीओकॉन कंपनीतील १०७६ आणि व्हॅल्यू इंडस्ट्रीज लिमिटेड या सहयोगी कंपनीतील ४२२ अशा एकूण १४९८ कामगारांना दि.०७.०१.२०१८ ते १८.०१.२०१८ या कालावधीत कारखाना उत्पादन प्रक्रिया देखभाल व दूरुस्तीसाठी बंद ठेवल्याने भर पगारी सुट्टी देण्यात आली होती. तथापि व्यवस्थापनाने प्रदर्शित केलल्या नोटीशीत तसा उल्लेख न करता अपरिहार्य कारणास्तव कंपनीस सुट्टी राहील असे नमूद केले होते.

(४) होय, चौकशीअंती असे आढळून आले की, सदर दोन्ही आस्थापनांचे कामकाज दि.१९.०१.२०१८ पासून पुर्ववत सूरु झाले आहे. तथापि, कामगारांचे वेतन विहित कालावधीत अदा करण्यात येत नाही.

(५) कामगारांचे वेतन विहित वेळेत अदा होत नसल्याने या दोन्ही आस्थापना विरुध्द वेतन प्रदान अधिनियम,१९६३ अन्वये मा.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी,पैठण, जि.औरंगाबाद येथे खटला दाखल करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई-सेंट्रल ते बोरीवली या नवीन रेल्वे मार्गिकेमुळे बाधीत होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(२३) १०९९५१ (१९-०४-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत लांब पल्याच्या रेल्वेगाड्यांमुळे उपनगरीय रेल्वेगाड्यांचे वेळापत्रक कोलमडू नये म्हणुन मुंबई सेंट्रल ते बोरीवली दरम्यान टाकण्यात येत असलेल्या पाचव्या-सहाव्या मार्गिका विरार पर्यंत करण्याचा पश्चिम रेल्वेचा विचार असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती रेल्वेलगतची घरे बाधित होऊन तेथील रहिवाशांचे विस्थापन होणार असल्यामुळे रेल्वे प्रशासनाशी समन्वय करुन प्रकल्पबाधीतांचे आहे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१८) :** (१), (२) व (३) मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्यामार्फत राबविण्याचे प्रस्तावित असलेल्या एमयुटीपी - ३ अ प्रकल्पग्रस्तांतर्गत बोरीवली ते विरार पाचवी व सहावी मार्गिका टाकणे या कामाचा समावेश आहे. सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाचा आर्थिक सहभाग व त्या अनुषंगाने प्रकल्पास इतर सहाय्य देण्याबाबतचा सध्या प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

---

**वाडा (जि.पालघर) ग्रामस्थांनी सुशिक्षित बेरोजगार संघर्ष समितीच्या वतीने आर.के. एक्सपोर्ट कंपनीविरोधात केलेल्या उपोषणाबाबत**

**(२४) ११०६२७ (१२-०४-२०१८). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.पालघर) ग्रामस्थांनी सुशिक्षित बेरोजगार संघर्ष समितीच्या वतीने दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास पासून आर.के. एक्सपोर्ट कंपनीविरोधात उपोषण केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ग्रामस्थांच्या मागण्यांचे स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, या मागण्यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येते,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (११-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कंपनीत स्थानिक कामगारांना पात्रतेनुसार समावून घेण्यात यावे. तसेच, कंपनीतील बांधकामे, वाहतूक व्यवस्था, व इतर कंत्राटी कामे स्थानिकांना देण्यात यावीत, सेवेत असलेल्या कामगारांना किमान वेतन, भत्ते व वेतनचिठ्ठी देण्यात यावी स्वरुपाच्या मागण्या संघर्ष समितीने दिनांक २५.०७.२०१८ रोजी कामगार आयुक्त कार्यालयात दिलेल्या निवेदनात करण्यात आल्या होत्या.

(३) कामगार उप आयुक्त, पालघर यांचे समोर उभयपक्षीची बैठक दि.१०.०८.२०१७ रोजी आयोजित करण्यात आली होती. तथापि, दिनांक ०९.०८.२०१७ रोजी कंपनी व्यवस्थापन व संघर्ष समितीमध्ये चर्चा होऊन त्यामध्ये स्थानिक कामगारांना कंपनीच्या मागणीनुसार टप्याटप्याने कामावर घेणे आणि कंपनीतील बांधकाम व इतर ठेकेदाराची कामे स्थानिकांना देण्यात येतील असा समझोता होऊन त्याच दिवशी उपोषण मागे घेण्यात आले. सद्यस्थितीत कंपनीतील कामगारांना किमान वेतन, वेतनचिठ्ठी इ.सुविधा देण्यात येत असून संघर्ष समितीची अथवा कामगारांची कोणतीही तक्रार प्रलंबित नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) शेणवा येथील शासकीय आदिवासी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२५) ११०६४५ (२४-०५-२०१८). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) शेणवा येथील शासकीय आदिवासी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची दुरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रशिक्षण संस्थेची दुरवस्था होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, ही प्रशिक्षण संस्था सुस्थितीत आणण्याकरिता शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१०-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ येथील टेक्सटाईल उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत**

**(२६) १११०४० (११-०४-२०१८). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव पेठ ( जि.अमरावती ) येथील टेक्सटाईल्स उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे यासाठी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, अमरावती यांनी प्रशिक्षणाचा प्रस्ताव शासनाला सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास तातडीने मान्यता द्यावी अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी मा.कौशल्य विकास मंत्री यांचेकडे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही. तथापि, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अमरावती यांनी अमरावती जिल्हयातील टेक्सटाईल्स पार्कमधील आस्थापनांना कुशल निमकुशल मनुष्यबळ पुरविणेकरिता जिल्हयातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करणेबाबतचा प्रस्ताव सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती यांचेकडे सादर केला होता व प्रादेशिक कार्यालय, अमरावती यांनी सदरचा प्रस्ताव संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना सादर केला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) अमरावती जिल्हयातील विद्यमान शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील उपलब्ध पायाभूत व प्रशिक्षण सुविधांचा १०० टक्के विनियोग करून विस्तार आराखडा तयार करण्याचे काम संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या स्तरावर सुरू असून सदर विस्तार आराखडयामध्ये मा. लोकप्रतिनिधी यांनी मागणी केलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबतची बाब तपासण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) येथील औद्योगीक प्रशिक्षण संस्थेची प्रवेश क्षमता वाढविण्याबाबत**

**(२७) ११२१३९ (१७-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) येथील औद्योगीक प्रशिक्षण संस्थेची (आय.टी.आय.) प्रवेश क्षमता सुमारे २११ इतकी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या औद्योगीक प्रशिक्षण संस्थामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कौशल्य शिक्षणाचा जास्तीतजास्त लाभ मिळावा व त्याची प्रवेश क्षमता वाढावी यासाठी मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता) यांना दिनांक ३० मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी विनंतीपत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पत्राची दखल घेवून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-०६-२०१८) :** (१) भोर (जि.पुणे) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) ची मंजूर प्रवेश क्षमता २१६ इतकी आहे.
(२) हे खरे आहे.

(३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या स्तरावर औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या विस्तार आराखडयाचे काम सुरू आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, भोर या संस्थेची प्रवेशक्षमता २१६ इतकी असून सदर प्रवेशक्षमता १७३ ने वाढवून एकूण प्रवेश क्षमता ३८९ करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांचे ऊस देयके थकित राहिल्याबाबत**

**(२८) ११२२७६ (२०-०४-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साखरेचे दर प्रति क्विंटलला रुपये सातशे ते आठशे घसरल्याने साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांची ऊस देयके माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान थकित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अनेक साखर कारखान्यांनी माहे डिसेंबर, २०१७ पासूनची देयके अदा केलेली नसून सुमारे २५ दिवसांची साखर विकून मागील पंधरा दिवसांची देयके भागवण्याचा प्रयत्न कारखान्यांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सध्या प्रति क्विंटल साखर विक्री व प्रति टन दिला जाणारा ऊसदर यांच्यामधील आर्थिक तुट दूर करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांच्या उसाचे देयके कारखान्यांकडून थकीत राहू नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१०-०७-२०१८) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.

सद्यस्थितीत राज्यबँकने सुधारीत मुल्यांकन दर रु.२९००/- प्रति क्विंटल केला असून मालतारण खात्यावर रु.१७१५ प्रति क्विंटल इतकी उचल दि.१४/०६/२०१८ पासून दिली जात आहे. त्यामुळे कारखान्यांना त्यांच्या मालतारण खात्यावर अपुरा दुरावा कमी होऊन काही प्रमाणात FRP शेतकऱ्यांची FRP देण्यासाठी रक्कमा उपलब्ध होत आहेत.
(३) साखर विक्री व प्रति टन दिला जाणारा ऊसदर यांच्यामधील आर्थिक तुट दूर करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांच्या ऊसाचे देयके कारखान्यांकडून थकीत राहू नये यासाठी केंद्र शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत,

१. साखरेची किमान विक्री किंमत रु.२९/- प्रति किलो इतकी करण्यात आली आहे.

२. बफर स्टॉक कोटा ३० लाख मे.ट. इतका देशासाठी जाहीर केला आहे.

३. इथेनॉल निर्मीती उद्योगास चालना देणेसाठी भांडवली गुंतवणुकीवर केंद शासनाकडून ६% व्याज परतावा देण्यात येणार आहे.

४. थकीत FRP देण्यासाठी २०१७-१८ मध्ये गाळप केलेल्या ऊसावर प्रति टन रु.५५/- उत्पादन अनुदान जाहीर करण्यात आले आहे.

५. साखर निर्यातीसाठी २० लाख मे.ट. कोटा देशातील साखर कारखान्यांना निर्धारीत करुन देण्यात आला आहे..

या सर्व निर्णयांचा एकत्रित परिणाम पहाता साखरेचे दर स्थानिक बाजारात वाढ होण्यास/स्थिरावण्यास मदत होणार आहे. परीणामत: शेतकऱ्यांची FRP अदा करणे सुलभ होणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई तसेच एमएमआरडीएच्या परिसरातील मेट्रो रेल्वे उभारणीचे काम ठराविक कालावधीत पूर्ण करण्याबाबत**

**(२९) ११२३२९ (१२-०४-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.मोहन फड (पाथरी), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई तसेच एमएमआरडीएच्या परिसरात मेट्रो रेल्वे उभारणीचे काम सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेट्रोच्या कामासाठी रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर खोदकाम करण्यात येत असल्यामुळे वाहतुकीस व नागरिकांना मोठा त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा. उच्च न्यायालयाने रात्री मेट्रोचे काम बंद ठेवण्याचे आदेश दिल्यामुळे मेट्रोचे काम पूर्ण होण्यास ठरलेल्या कालावधीपेक्षा जास्त वेळ लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मेट्रोचे काम ठराविक कालावधीत पूर्ण व्हावे यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार वा करित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१८) :** (१) होय.

(२) मुंबईमध्ये मेट्रो मार्गाच्या सुरु असलेल्या स्थापत्य कामामुळे काही ठिकाणी वाहतुक कोंडी होते. सदर वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी वाहतूक व्यवस्थापन योजना तयार करण्यात आली असून सदर योजनेची अंमलबजावणी वाहतूक पोलीस, परिवहन सहाय्यक यांच्यामार्फत करण्यात येत असून यामुळे वाहतूक समस्येमुळे होणाऱ्या प्रवाशांच्या गैरसोयीचे निराकरण होईल.

(३), (४) व (५) मा.उच्च न्यायालयाने ध्वनी प्रदूषण मुद्यावर ठराविक ठिकाणी रात्री काम बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. तथापि, ठरविण्यात आलेल्या कालावधीत काम पूर्ण करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल्वेचे कामात येणाऱ्या अडचणी/अडथळ्यांवर उपाययोजना करुन सदर काम युध्दपातळीवर नियोजित कालावधीत पूर्ण करण्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. प्रयत्नशिल आहे.

---

**वसमत (जि.हिंगोली) येथील फळरोप वाटीका व बीजगूनन केंद्र येथील मजुरांना मजुरी देण्याबाबत**

**(३०) ११२५९४ (१२-०४-२०१८). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत, (जि. हिंगोली) येथील फळरोप वाटीका व बीजगूनन केंद्र येथील मजुरांना गत १६ महिन्यांपासून मजुरी दिलेली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मजुरी न दिल्यामुळे त्या मजुरांची आर्थिक अडचण होत असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मजुरांना मजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०९-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे. वसमत येथील फळरोप वाटीकेतील ६ रोजंदारी कामगार आणि बिजगुनन केंद्रातील १६ रोजंदारी कामगारांना माहे ऑगस्ट, २०१६ पासून ११ ते १२ महिन्यांचे वेतन मिळाले नसल्याबाबत मराठवाडा सर्व श्रमिक संघटना यांनी त्यांचे दि. २२.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक कामगार आयुक्त, नांदेड व त्यांच्या अधिपत्याखालील सरकारी कामगार अधिकारी, हिंगोली यांचेकडे तक्रार दिली होती.

(२) अंशत: खरे आहे. उप विभागीय कृषी अधिकारी हिंगोली यांच्यामार्फत फळरोप वाटीकेतील ६ कामगारांना माहे ऑगस्ट २०१६ ते फेब्रुवारी, २०१८ या १९ महिन्याच्या कालावधीचे थकीत वेतन अदा केल असून बीजगुनन केंद्रातील १६ कामगारांना माहे ऑगस्ट, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या ७ महिन्याच्या कालावधीचे थकीत वेतन दि. २४ एप्रिल, २०१८ रोजी अदा केले आहे.

(३) मराठवाडा सर्व श्रमिक संघटनेच्या दिनांक २२ जून, २०१७ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने सरकारी कामगार अधिकारी, हिंगोली व सहाय्यक कामगार आयुक्त, नांदेड यांनी वरील नमूद संघटना, रोजंदारी कामगार आणि कृषी विभाग फळ रोप वाटीकेचे व बीजगुनन केंद्राचे अधिकारी यांच्या दिनांक ३०.०१.२०१७, ११.०७.२०१७, २४.०८.२०१७ व २७.०९.२०१७ रोजी बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने मजूरांचे थकीत वेतन अंशत: अदा केले असून उर्वरीत वेतन अदा करण्याबाबत पाठपूरावा चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाचोरा शहरातील हिवरा नदीवर स्मशानभूमी पासून जळगांव रस्त्यापर्यंत पूल (ब्रिज) बांधण्याबाबत**

**(३१) ११३०८० (०३-०४-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा शहरातील हिवरा नदीवर स्मशानभूमी पासून जळगांव रस्त्यापर्यंत पूल (ब्रिज) बांधणेकरिता वैशिष्टयपूर्ण योजनेतून ३ कोटी रुपयांचा निधी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनावर अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक २२ फेब्रुवारी,२०१८ च्या शासन निर्णयानुसार विशेष रस्ता अनुदान अंतर्गत रु.२ कोटी इतका निधी पाचोरा नगरपरिषदेस वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पवनी (ता.जि.भंडारा) येथील प्राचीन ऐतिहासिक स्मारकाचे नुतनीकरण व संग्रहालयाच्या निर्मितीबाबत

**(३२) ११३१६५ (०६-०४-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवनी (ता.जि.भंडारा) येथिल प्राचीन ऐतिहासिक स्मारकाचे नूतनीकरण व संग्रहालयाच्या निर्मितीसाठी तसेच पर्यटन विकासामुळे बेरोजागांराना रोजगार उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींद्वारे मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांना दिनांक २१ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास ऐतिहासिक पर्यटन स्थळाचा विकास करून विकास आराखडा तयार करण्यासाठी प्रधान सचिव, सांस्कृतिक विभाग मंत्रालय, मुंबई यांना दिनांक २० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पवनी (जि.भंडारा) येथील प्राचीन ऐतिहासिक, राष्ट्रीय प्राचीन वस्तू संग्रहालयाची निर्मिती करण्यासाठी प्रधान सचिव, सांस्कृतिक विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी योग्य ती चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच विकास आराखडा तयार करण्यासाठी संबंधित विभागाला निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार प्राचीन ऐतिहासिक स्थळांचा प्रत्यक्ष स्थळ पाहणी अहवाल व अंदाजपत्रक शासन स्तरावर सादर करून विकास निधी उपलब्ध करून देण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०४-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, नागपूर मंडल कार्यालयाच्या अधिपत्याखाली पवनी जि.भंडारा येथे तीन राष्ट्रीय संरक्षित स्मारक आहेत. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, नागपूर मंडल या कार्यालयाकडे सदर जागी वस्तुसंग्रहालय/ इन्टरप्रिटेंशन केंद्र उभारण्यास जागा उपलब्ध नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा ठाणा (ता.जि.भंडारा) येथील भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत पाणीपुरवठा पाईपलाईन नादुरुस्त असल्याने सदर कामाची चौकशी होण्याबाबत**

**(३३) ११३१६७ (१४-०४-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा ठाणा (ता.जि.भंडारा) येथील भारत निर्माण कार्यक्रमा अंतर्गत पाणीपुरवठा पाईप लाईन नादुरुस्त असल्याने स्थानिक नागरिकांना पाणीपुरवठा सुरळीत होत नाही याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींद्वारे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांना तक्रार केली त्यानुसार दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास अधीक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नागपूर यांना लेखी पत्राद्वारे चौकशी करून १५ दिवसाच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नागपूर यांनी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, याबाबत संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१०-०७-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) होय.

सदर प्रकरणी अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नागपूर यांनी चौकशी करुन दिनांक १६/२/२०१८ रोजी चौकशी अहवाल सादर केला आहे.

त्यानुसार, सदर योजनेतील वितरण व्यवस्थेचे काम योग्यरित्या करण्यात आले असून सद्यस्थितीत काही भागामध्ये सार्वजनिक नळाद्वारे चाचणी स्वरुपात पाणी पुरवठा सुरु आहे. तसेच ज्या भागात पाणी पुरवठा सुरु नाही, त्या भागातील ग्रामस्थांनी तसेच ग्रामपंचायत ठाणा यांनी पाणी पुरवठा सुरु करण्याबाबत उपविभागीय अभियंता यांना विनंती केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात २५ महापालिका क्षेत्रामध्ये एलबीटी रद्द करण्यात आल्याने महापालिकांच्या उत्पन्नात घट झाल्याबाबत**

**(३४) ११३३४२ (१८-०४-२०१८). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २५ महापालिका क्षेत्रामध्ये दिनांक १ ऑगस्ट पासून एलबीटी रद्द करण्यात आल्याने महापालिकांच्या उत्पन्नात येणारी तूट अनुदान रुपाने भरुन देण्याचा निर्णय शासनाने घेतल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याकरिता चालु आर्थिक वर्षात २०९८ कोटी रुपयांची रक्कम पुरवणी मागण्यांद्वारे मंजुर करुन ४११.६९ कोटी रुपयांची रक्कम वितरीत करण्यास शासनाने मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चंद्रपुरला ७ कोटी ४४ लाख तर लातुरला अवघे ९१ लाख रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लातूर शहरास कमी अनुदान देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय.

चंद्रपूर महानगरपालिकेस सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये ऑगस्ट २०१५ ते मार्च २०१६ या ८ महिन्याच्या कालावधीमध्ये रु. २७.२० कोटी ऐवढे सहाय्यक अनुदान स्थानिक संस्था करापोटी येणारी तूट भरुन काढण्यासाठी वितरीत करण्यात आले आहे. तर लातुर महानगरपालिकेस याच कालावधीत रु. ६.१९ कोटी वितरीत करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक येथील कार्यकारी अभियंता व मुख्य लिपीकाला अटक करण्यात आल्याबाबत

**(३५) ११३७९० (१४-०४-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक येथे बेरोजगार ईलेक्ट्रिकल इंजिनिअरची नोंदणी करुन घेण्यासाठी २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना कार्यकारी अभियंता व मुख्य लिपीकाला अटक करण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त कार्यकारी अभियंता व मुख्य लिपीकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१८) :** (१) होय.

दिनांक ०१.०२.२०१८ रोजी आरोपी लोकसेवक १) रामदास सोन्याबापु कांबळे, कार्यकारी अभियंता, वर्ग १ व आलोसे नं. २) आप्पा शिवराम केदार, लिपीक, वर्ग ३, दोन्ही नेमणुक

सा.बां. विद्युत विभाग नाशिक यांनी तक्रारदार श्री. अमोल भागुजी आव्हाड, वय २६ रा. मोरवाडी गांव सिडको ता.जि. नाशिक यांच्याकडे सुशिक्षित बेराजगार अभियंता म्हणुन नोंदणी करण्याकरिता शासकीय फी रू. ७,५००/- व त्याव्यतिरिक्त लाच म्हणुन १२,५००/- रूपये असे एकुण तक्रारदार यांचेकडे २०,०००/- रूपये मागणी करून पंच व साक्षीदार यांचे समक्ष स्विकारली असता त्यांना पकडण्यात आले आहे.

(२) आरोपी लोकसेवक १) रामदास सोन्याबापु कांबळे, कार्यकारी अभियंता व आलोसे नं. २) आप्पा शिवराम केदार, लिपीक, वर्ग ३, दोन्ही नेमणुक सा.बां. विद्युत विभाग नाशिक यांचेविरूध्द मुंबई नाका पो.स्टे. नाशिक शहर येथे गु.र.नं. ४५/२०१८ भ्र.प्र.अधिनियम १९८८ चे कलम ७,१२,१३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे दिनांक ०२.०२.२०१८ रोजी दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा तपास सुरू आहे.

(३) व (४) दिनांक ०७.०२.२०१८ चे आदेशान्वये आरोपी लोकसेवक क्र. १) रामदास सोन्याबापु कांबळे, कार्यकारी अभियंता, वर्ग १, व आरोपी लोकसेवक क्र. २) आप्पा शिवराम केदार, लिपीक, वर्ग ३, दोन्ही नेम. सा.बां. विद्युत विभाग नाशिक यांना निलंबित करण्यात आलेले आहे.

---

**नाशिक व औरंगाबादमध्ये बांधलेली सुमारे ९२१ घरे विक्रीविना पडून असल्याबाबत**

**(३६) ११३७९१ (०३-०४-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडाच्या घरांना एकीकडे प्रचंड मागणी असताना दुसरीकडे नाशिक व औरंगाबादमध्ये बांधलेली सुमारे ९२१ घरे विक्रीविना पडून असल्याची धक्कादायक बाब माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी विकसकांच्या तुलनेत म्हाडाच्या घरांचे दर जास्त असल्याने या दोन्ही शहरांतील घरांकडे ग्राहकांनी दुर्लक्ष केले असल्याने म्हाडाचे रुपये २६३ कोटींचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या घरांच्या किंमती कमी करुन ही घरे सर्वसामान्यांना परवडतील अशा रकमेत विक्री करण्याबाबत शासनस्तरावरुन कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२६-०६-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

नाशिक व औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळांतर्गत एकूण १७६७ सदनिका/घरे मागणी अभावी रिक्त असून जवळपास एकूण रु.३४५ कोटी एवढा निधी अडकलेला आहे.

(३) व (४) नाशिक व औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे मागणी अभावी रिक्त असलेल्या सदनिकांच्या किंमती यापूर्वी जाहीर केलेल्या किंमतीपेक्षा कमी करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणास मंजूरीस्तव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**सेलू (जि.परभणी) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा कारभार अनेक समस्यासह जीर्ण झालेल्या इमारतीत सुरू असल्याबाबत**

**(३७) ११४११८ (२४-०४-२०१८). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (जि.परभणी) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची इमारत जीर्ण झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारत बांधकामासाठी मराठवाडा अनुशेष निधी मंजूर असून केवळ जागे अभावी नवीन इमारतीचे बांधकाम अद्याप सुरू करता आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू इमारतीसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१०-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सेलूसाठी नगर परिषद, सेलू यांची इमारत १९९७ पासून भाड्याने घेतलेली असून सदरील इमारतीची अवस्था व्यवस्थित असून केवळ या इमारतीस नगर परिषदेद्वारा रंगरंगोटी होणे आवश्यक आहे. तथापी सदरहु इमारत जीर्ण झालेली नाही.

(२) अद्याप भुसंपादन झालेले नसल्यामुळे केवळ जागे अभावी नविन इमारतीचे बांधकाम अद्याप सुरु करता आले नाही, हे खरे आहे.

(३) व (४) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सेलूच्या भुसंपादनासाठी मौजे सेलू, ता. सेलू, येथील गट क्रमांक २२१ मधील परमपोक असलेली २ हेक्टर शासकीय जमीनीचा, निर्विवाद व अतिक्रमण नसलेल्या जागेचा प्रस्ताव, जिल्हाधिकारी, परभणी यांना दि. २५.०१.२०१७ रोजी सादर केलेला आहे. सदरील सर्व्हे नंबर २२१ मधील १ हेक्टर २१ आर जमीन सहकारी पोलिस कर्मचारी संस्था यांना दि. ०२.०८.१९८३ रोजी देण्यात आली होती. संस्थेने सदरील जमीनीवर दोन वर्षात विकास करावयास पाहीजे होता, तथापी त्यांनी या जमीनीवर विकास न केल्यामुळे उपजिल्हाधिकारी कार्यालयाने शर्तभंग कार्यवाही सुरु केलेली आहे, ही कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सदरील १ हेक्टर २१ आर गायरान जमीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था सेलूकरीता उपलब्ध करुन दण्यात येईल असे तहसिलदार, सेलू यांनी कळविले आहे.

सेलू येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस भुसंपादन लवकरात लवकर करणेसाठी संबंधित कार्यालयांस सतत पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

**पंतप्रधान आवास योजनेंतर्गत सर्वांसाठी घरे ही योजना बृहन्मुंबईसह ५१ शहरांत मंजुर करण्यात आल्याबाबत**

**(३८) ११४५५७ (०३-०४-२०१८). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील गावपातळीवर राहणाऱ्या प्रत्येक गरिब व्यक्तिस सन २०२२ पर्यंत पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घर देण्यात येईल अशा घोषणेसह राज्यात बृहन्मुंबईसह ५१ शहरांत ही योजना मंजुर करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार झोपडपट्टीवासीय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व्यक्ती, अल्प उत्पन्न गटातील व्यक्ती आणि वैयक्तिक मालकीच्या जागेवर घरबांधणीस २.५० लाख रुपयांपर्यंत अनुदान अशा ४ गटातील व्यक्ती पात्र ठरविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्रातून ३२ प्रकल्पांमधील १ लाख ७६ हजार घरकुलांचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले असून संबंधित कृती आराखडा आणि वार्षिक अंमलबजावणी आराखडा तयार करण्यासाठी शासनाने ५ कोटी ६ लाख रुपयांचा पहिला हप्ता वितरीत करण्यास मंजुरी दिली हे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात एकूणच या योजनेत प्राप्त अर्ज, पात्र लाभार्थी आणि वर्षनिहाय केंद्रित करण्यात आलेले घरांचे लक्ष्य व प्रत्यक्ष उद्दिष्टपूर्तीकडे सुरु असलेली प्रशासकियदृष्ट्या वाटचाल या बाबींचा मेळ घातला असता या योजनेच्या जाचक अटी व प्रशासकिय यंत्रणेच्या उदासिनतेमुळे प्रलंबित असलेली कार्यवाही यामुळे सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे ही प्रधानमंत्री आवास योजना फक्त कागदोपत्री असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत राज्यात प्राप्त एकूण अर्ज व पात्र तसेच अपात्र अर्ज आणि प्रत्यक्ष कार्यवाही याबाबतच्या माहितीचा तपशील काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता (१०-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. प्रधानमंत्री आवास योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी दि.९.१२.२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर योजनेत आजमितीस ३८२ शहरांचा समावेश केला आहे.
(२) होय, हे खरे आहे. या योजनेत सहभागी होणाऱ्या लाभार्थ्यास केंद्र शासनाकडून रु. १/१.५० लक्ष तर राज्य शासनाकडून रु. १ लक्ष इतके अनुदान देण्यात येते.
(३) केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने राज्यातील १५३ प्रकल्पातील एकूण ३,०७,८३८ घरकुलांना (२,०३,६२९ EWS घरकुले) मंजुरी दिली आहे. घटक क्र.२ CLSS खाली १८ एप्रिल, २०१८ पर्यंत ४०,५९९ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळालेला आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत कृती आराखडा व वार्षिक अंमलबजावणी आराखडा तयार करण्यासाठी केंद्र शासनाने रु.५००.०६ लक्ष एवढा निधी प्राप्त झाला आहे. सदरहू निधी ५१ महानगरपालिका/नगरपालिकेस वितरीत करण्यात आला आहे.
(४) हे खरे नाही. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत सन २०१७-१८ पर्यंत राज्यातील घरकुल बांधण्याचे राज्यातील उद्दिष्ट १ लाख ९४ हजार ठरविले होते. त्यानुसार सद्य:स्थितीत केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने राज्यातील १५३ प्रकल्पातील एकूण ३,०७,८३८ घरकुलांना (२,०३,६२९ EWS घरकुले) मंजुरी दिली आहे.
(५) केंद्र शासनाच्या PMAY-MIS पोर्टलवरील दिनांक ०९.०५.२०१८ पर्यंतच्या माहितीनुसार प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) खाली चारही घटकातील महाराष्ट्र राज्यातील मागणी सर्वेक्षण अर्ज (Demand Servey) खालीलप्रमाणे :

१) नागरी स्वराज्य संस्था यांनी नोंद केलेले अर्ज- ४,५९,५००

२) Common Service Centre (CSC) संस्थेकडून नोंद केलेले अर्ज-८,१३,८६५

३) Online नोंद झालेले अर्ज-१२,०८,७६० नागरी स्वराज्य संस्था (महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद) यांच्या स्तरावर त्यांच्या शहरातील मागणी सर्वेक्षण अर्जदारांच्या अर्जाची पडताळणी करण्यात येऊन वैधता निश्चित करुन केंद्र शासनाच्या MIS प्रणालीवर अपलोड करण्याचे काम सुरु आहे.

---

**ठाणे, कल्याण, डोंबिवली(जि.ठाणे) येथील ग्रामीण भागामध्ये दुधावर अतिरिक्त शुल्क आकारुन ग्राहकांची फसवणूक होत असल्याबाबत**

**(३९) ११४६८२ (२०-०४-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व ठाणे येथील रेशनिंग दुभाजकांमध्ये महानंदचे दूध व दूग्धजन्य पदार्थ विक्री करण्यास शासनाने दिनांक १९ जानेवारी,२०१८ रोजी वा त्यासुमारास परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे, कल्याण, डोंबिवली (जि.ठाणे) येथील ग्रामीण भागातील शिधावाटप केंद्रात महानंद दूध शाळेचे अधिकृत विक्रेते नसलेल्या भागांमध्ये दुधावर अतिरिक्त शुल्क आकारुन दूधाची विक्री होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानंद दुध शाळेचे अधिकृत केंद्र नसलेल्या भागातील नागरिकांना यांचा लाभ होणार असल्याचे शासनाकडून सांगण्यात आले मात्र ग्राहकांना छापील किंमतीपेक्षाही जास्त किंमत देऊन दुध खरेदी करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत अनेक तक्रारी प्रशासनाकडे करुन देखील यावर कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०६-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) ठाणे जिल्ह्यातील जिल्हा पुरवठा अधिकारी, ठांणे यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या कल्याण तालुक्यातील ग्रामीण भागात अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तेल्हार तालुक्यातील (जि.अकोला) रास्त भाव धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारकांच्या विविध मागण्यांबाबत**

**(४०) ११४९१८ (२०-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल्हार (जि.अकोला) तालुक्याती रास्त भाव धान्य दुकानदार व केरोसीन परवाना धारकांनी आपल्या विविध मागण्यांचे निवेदन तहसिलदार यांना दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त मागण्यांची पुर्तता करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-०६-२०१८) :** (१) व (२) होय, खरे आहे, तालुका रास्तभाव दुकानदार संघटना, तेल्हारा, जि.अकोला यांच्या निवेदनात १) रास्तभाव दुकानदार व केरोसीन परवानाधारक यांना मानधन देण्यात यावे. २) मालेगांव येथे झालेल्या भ्याड हल्लयाचा निषेध करित आहोत. ३) पॉस मशिनव्दारे धान्य वाटप मशिन दुरुस्ती होईपर्यंत लागू करण्यात येवू नये. ४) वाधवा कमिटीचा अहवाल मानधन देण्याचा लागू करण्यात यावा, या मुद्दयांचा समावेश आहे.

निवेदनाच्या अनुषंगाने वस्तुस्थिती पुढील प्रमाणे :-

मुद्दा क्र. १ व ४ - रास्तभाव दुकानदारांचे मानधन देण्याची मागणी आवाजवी व वस्तुस्थितीस धरुन नाही.

मुद्दा क्र. २-दि.११.१.२०१८ रोजी सौ . जागृती तिवारी रास्तभाव दुकानदार ता.मालेगांव, जि.वाशिम या लाभार्थ्यांना धान्य वितरण करित असताना काही लाभार्थ्यांचे आधार क्रमांक नोंद नसल्याचे दिसून आल्याने रास्तभाव दुकानदार यांनी लाभार्थी यांना आधार कार्डच्या छायांकित प्रतींची मागणी केली. लाभार्थ्यांनी याबाबतीत रास्तभाव धान्य दुकानदार यांचे पती श्री.गणेश तिवारी व नातेवाईक यांच्याशी शिधापत्रिकांचे वाद घालून त्याचे पर्यावसण हाणामारीत झाले. परिणामी मालेगाव शहरात दगडफेक व वाहनांची तोडफोड होवुन मालेगाव शहरात काही काळ जातीयतेढ व तणाव निर्माण झाला होता. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन मालेगाव येथे एकमेकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आले आहेत. अन्न धान्य वितरणाबाबत कोणतीही तक्रार नाही.

मुद्दा क्र. ३-राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणीकीकरण प्रकल्पातंर्गत सर्व रास्तभाव दुकानातुन ई*- पॉस मशिनव्दारे धान्याचे वाटप करण्यात येत आहे. अकोला जिल्हयात १०५६ रास्तभाव दुकानांत ई-पॉस मशिन बसविण्यात आल्या असून १०५५ ई-पॉस मशीनमधून धान्याचे वाटप करण्यात येत आहे. माहे मार्च २०१८ Aadhar enabled Public Distribution System (AePDS) या नविन सॉफ्टवेअरचा वापर अकोला जिल्हयामध्येही करण्यात येत आहे. याव्दारे १०० टक्के AAdhar Authenticate करून धान्य वाटप करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत महानगरपालिकेच्या कारवाईच्या भीतीने भाज्या - फळे गटारात लपविणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(४१) ११५२६० (१२-०४-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांताक्रूझ (मुंबई) येथील वाकोला परिसरात मुंबई महानगरपालिकेच्या कारवाईच्या भीतीने फेरीवाले भाज्या- फळे गटारात लपवत असल्याचा व्हिडीओ माहे फेब्रुवारी, २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान सोशल मिडीयावर व्हायरल झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने या व्हिडीओच्या सत्यतेबाबत पडताळणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, त्यानूसार मुंबईकरांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या संबधित फेरीवाल्यांवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) असल्यास, या प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना हाती घेतल्या आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सांताक्रुझ (पूर्व) येथील नेहरु रोड येथे पावसाळी पाणी वाहून नेणाऱ्या गटारामध्ये अनधिकृत फेरीवाल्यांनी भाजीपाला व इतर सामान लपविल्याचे दिनांक ०९.०२.२०१८ रोजीच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आले.

सदर घटनेनंतर दिनांक १० फेब्रुवारी, २०१८ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन पथकामार्फत कारवाई करुन सदर अनधिकृत फेरीवाल्यांचा माल जप्त करुन गोडाऊनमध्ये ठेवण्यात आला.

सदर घटनेसंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वाकोला पोलीस ठाणे, सांताक्रुझ (पूर्व) येथे दिनांक १० फेब्रुवारी, २०१८ रोजी अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याकरिता तक्रार नोंदविण्यात आली आहे.

सदर परिसरात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत फेरीवाला निर्मुलनाची दैनंदिन कारवाई करण्यात येत आहे. तसेच, सदर रस्त्यावर फेरीवाल्यांना बसण्यास मज्जाव करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दिंडोरी रोडवर (जि.नाशिक) महावितरणच्या पंचवटीतील मार्केट यार्ड शाखा कार्यालयालगत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वसाहतींच्या तीन मजली इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४२) ११५२९६ (०४-०४-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिंडोरी रोडवर (जि.नाशिक) महावितरणच्या पंचवटीतील मार्केट यार्ड शाखा कार्यालयालगत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वसाहतीच्या तीन मजली इमारतीची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इमारतीची दारे व खिडक्या तसेच साहित्य चोरीला गेले असून सदर इमारतीमध्ये डुकरांचा वावर, कचरा समस्या व ड्रेनेजची दुरवस्था झाल्याच्या तक्रारी महावितरण अधिका-यांकडे स्थानिक रहिवाश्यांनी व कर्मचाऱ्यांनी वारंवार निवदनाव्दारे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तक्रारींच्या अनुषंगाने दुरवस्था दूर करण्याबाबत महावितरण कंपनीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. परंतु, महावितरण कंपनीचे कर्मचारी पंचवटीतील मार्केटयार्ड शाखा कार्यालयालगत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वसाहतीमध्ये वास्तव्यास आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सदर इमारतीच्या परिसरात, ई-निविदेद्वारे कार्यादेश देण्यात आले असून दैनंदिन साफसफाईची कामे व परिसराची योग्य ती देखभाल करण्यात येत आहे. सदर इमारतीची तातडीची व निकडीची दुरुस्ती कामे केली आहेत. परंतु, लगतच्या झोपडपट्टी वसाहतीमुळे इमारतीचे व तत्सम साहित्य चोरीला गेले आहे व त्यासंदर्भात महावितरण कंपनीतर्फे पोलीस तक्रारीही दाखल करण्यात आल्या आहेत. सदर संपूर्ण इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यासंदर्भातील अहवाल प्राप्त झाल्यानंतर इमारतीच्या डागडुजीची कामे करण्यात येतील.

---

**आयटीआय विद्यार्थ्यांची परीक्षा ऑनलाईन घेण्यात येणार असल्याबाबत**

**(४३) ११५४२१ (१९-०४-२०१८). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील ३६ ट्रेड ची जिल्हा स्तरावरील परिक्षा लेखी स्वरुपात दिनांक ५ फेब्रुवारी रोजी घेण्यात येणार होती. परंतु दिनांक ३ फेब्रुवारी रोजी व्यवस्थापन शिक्षण व प्रशिक्षण संस्थाना पत्राद्वारे ऐनवेळी सदर परिक्षा दिनांक १७ ते २१ फेब्रुवारी दरम्यान ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे घेण्यात यावी असे पत्राद्वारे कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये सुतारी, ड्रेसमेकींग,टेलरींग, कटींग, प्लंबर या ट्रेडचा संबंध कॉम्प्युटर शी नसतांना या परीक्षा ऑनलाईन व इलेक्ट्रॉनिक या संगणकाशी संबंधीत ट्रेडची परीक्षा लेखी स्वरुपात घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऐनवेळी परीक्षा ऑनलाईन घेतल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.

जिल्हयाच्या ठिकाणी ज्या संस्था कार्यरत आहेत. तेथील प्रशिक्षणार्थ्यांची ३५ व्यवसायांची प्रथम सत्राची परीक्षा जिल्हास्तरावरील परीक्षा केंद्रावर ऑनलाईन पध्दतीने MahaIT यांनी नेमलेल्या एजन्सीमार्फत घेण्यात आली आहे व तालुका स्तरावरील प्रशिक्षणार्थ्यांची परिक्षा ऑफलाईन पध्दतीने घेण्यात आली आहे.
(३) नाही, हे खरे नाही.
(४) ऑनलाईन परीक्षा पध्दत व ऑनलाईन मुल्यमापन या प्रक्रिया भिन्न असून, ऑनलाईन परीक्षा डीजीटी, नवी दिल्ली यांनी पुरविलेल्या वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या आधारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली आहे. जुलै-२०१७ मध्ये प्रायोगिक तत्वावर घेण्यात आलेल्या एका व्यवसायाच्या ऑनलाईन परीक्षेच्या अनुभवावरून, जानेवारी/ फेब्रुवारी २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षापैकी सदर ऑनलाईन परीक्षा फक्त ३५ व्यवसायांच्या, प्रथम सत्राच्या केवळ जिल्हास्तरावरील परीक्षा केंद्रातील प्रशिक्षणार्थ्यांसाठी सर्व सोयी-सुविधा उपलब्ध असलेल्या केंद्रात घेण्यात आल्या असून सदर परीक्षा यशस्वीपणे राबविण्याची खात्री करूनच शासनाने निर्णय घेतलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तेचे मुल्यांकन प्रक्रीयेमध्ये होत असलेल्या विलंबाबाबत

**(४४) ११५४२३ (१२-०४-२०१८). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती महानगरपालिका क्षेत्रात GIS प्रणालीवर आधारीत मालमत्तांचे सर्व्हेक्षण व मॅपींग करण्याकरीता महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात आलेली निविदा प्रक्रीया माहे नोव्हेंबर महीन्यात स्थगित करुन शासन स्तरावर नगरपरीषद प्रशासन संचालनालयाकडून ही प्रक्रीया पार पाडण्याचे शासनाचे निर्देश आहेत परंतु त्यांच्या अंमलबजावणी अभावी मालमत्तांचे मुल्यांकन प्रलंबित असल्याने महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची सुरुवात कधी पासून करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०१८)** : (१), (२) व (३) यासंदर्भात विषयांकित काम सुरु करण्याकरिता शासनाकडून नियुक्त कंपनीस दिनांक २१/११/२०१७ च्या पत्रान्वये निर्देशीत करण्यात आले आहे.

कंपनीकडून प्रत्यक्ष सर्व्हेक्षणाचे कामास दिनांक ०५/०४/२०१८ पासून सुरुवात करण्यात आली असून, सद्य:स्थितीत एकूण ५६,६४९ मालमत्तांचे सर्व्हेक्षण करण्यात आलेले आहे.

महानगरपालिका हद्दीतील संपूर्ण मालमत्तांचे सर्व्हेक्षण पूर्ण झाल्यानंतर, उपलब्ध माहितीच्या आधारे मालमत्ता कराचे निर्धारण करणे प्रस्तावित आहे. असे आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद आहे.

---

## अमरावती महानगरपालिकेत पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुलांचा निधी वितरीत न झाल्याबाबत

**(४५) ११५४२५ (०६-०४-२०१८). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यात येत असलेल्या पंतप्रधान आवास योजनेच्या घटक क्र.४ अंतर्गत ३ हजार लाभार्थीकरीता वितरीत करण्यात येणारा रुपये ३६ कोटींचा निधी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान पासून वितरीत करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१०-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही. केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत प्राप्त झालेला निधी राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती (SLSMC) व केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती (CSMC) यांनी नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून वितरीत करण्याबाबत दि.२९.१२.२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत (शहरी) अमरावती महानगरपालिकेच्या घटक क्र. ४ खालील प्रकल्पास दि.२८.४.२०१६ रोजीच्या CSMC च्या बैठकीत मंजुरी मिळाली. त्यानुसार राज्य सुकाणू अभिकरण म्हाडाने दि. ३१.१.२०१७ रोजी केंद्राचे रु.३६.९४८ कोटी अनुदान अमरावती महानगरपालिकेला वितरीत केले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्हयातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना पंतप्रधान रोजगार योजनेअंतर्गत कर्ज मिळविताना येत असलेल्या अडचणी

**(४६) ११५५४२ (१७-०४-२०१८). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यात सुमारे दीड लाख युवक-युवती बेरोजगार असून त्यापैकी अनेक सुशिक्षित बेरोजगार युवकांनी पंतप्रधान रोजगार योजनेअंतर्गत राष्ट्रीयीकृत बँकांकडे ऑनलाईन कर्जप्रकरणे करून देखील अनावश्यक कागदपत्रांची मागणी करत बँका कर्ज प्रकरणे नाकारत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत संबंधित तरुणांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊनसुद्धा त्याची दखल घेतली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बेरोजगार युवकांकडे आयटी रिटर्न, बँक स्टेटमेंट आणि शासकीय जमीनदार अशी विविध कागदपत्रे नसल्याने तसेच जिल्हा बँकांचे टार्गेट पूर्ण झाल्याचे कारणे देऊन बँकांनी अनेक कर्जप्रकरणे नामंजूर केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बेरोजगार तरुणांना पंतप्रधान रोजगार योजनेअंतर्गत कर्ज मिळणे सुकर व्हावे यासाठी शासनातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०६-०७-२०१८) :** (१) नाही.

पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमातंर्गत जिउकें सातारा ची प्रगती खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | लक्षांक (रु.लाखात) | | प्राप्त प्रकरणे | जिल्हा कार्यबल समितीमार्फत बँकाना शिफारस केलेली पत्र प्रकरणे | बँकानी मंजूर केलेली प्रकरणे | | मंजूरीची टक्केवारी | | बँकेने नामंजूर केलेली प्रकरणे | बँकेकडे प्रलंबित प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | अनुदान | | | संख्या | अनुदान | संख्या | अनुदान | | |
| २०१७-१८ | ७३ | १४४.८० | ४५३ | ३३६ | ६५ | १६२.८९ | ८९% | ११२% | १४० | १३१ |
| २०१८-१९ (दि. २८.०६.१८ अखेर) | ४१ | १०३.०० | ४५ | १३ | ४ | २०.१८ | १०% | २०% | -- | १२९ |

(२) लागू नाही.

(३) नाही.

पंतप्रधान रोजगार निर्मिती योजनेचा लाभ नव्याने उद्योग स्थापित करणाऱ्या बेरोजगारांना घेता येतो. योजनेंतर्गत मुख्यालय स्तरावरून जिल्ह्यांस निश्चित केलेले लक्षांक महाव्यवस्थापक व जिल्हाअग्रणी बँक व्यवस्थापक यांच्या समन्वयाने बँकाना वाटप केले जातात.

सन २०१८-१९ करीता जिल्ह्यास ४१ प्रकरणाचे भौतिक व रक्कम रू. १०३.०० लक्ष मार्जिन मनी (अनुदान) चे आर्थिक लक्षांक निश्चित केलेले आहे. दि. २८/०६/२०१८ पर्यंत

ऑनलाईन कार्यप्रणालीवर ४५ प्रकरणे प्राप्त झालेली असून, आगामी काळात प्राप्त होणाऱ्या प्रकरणांतून पात्र प्रकरणे जिल्हा कार्यबल समितीच्या शिफारशीसह बँकेत सादर केली जातात. मागील वर्षातील प्रलंबित प्रकरणे व चालू वर्षातील प्रकरणांच्या मंजूरी व वाटपाच्या पुढील प्रक्रियेबाबत जिल्हा स्तरावर बँकाकडे पाठपुरवठा करण्यात येत आहे.
(४) योजनेंतर्गत कार्यप्रणाली सुकर व गतिमान होण्यासाठी, योजनेची अंमलबजावणीसाठी स्वतंत्र संकेतस्थळ सुरू करण्यात आलेले असून, संपूर्ण अंमलबजावणी संकेतस्थळावरून करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईत एमएमआरडीए, एमएसआरडीसी किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधण्यात येत असलेल्या रस्ते, उड्डाणपूल यांचे हस्तांतरण बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे करण्यात येत असल्याबाबत

**(४७) ११६०५७ (१२-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत एमएमआरडीए, एमएसआरडीसी किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधण्यात येत असलेल्या रस्ते, उड्डाणपूल यांचे हस्तांतरण बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे करताना ते परिपूर्ण आणि सर्व अधिकारांसह करण्यात येत नसल्याने नंतरच्या काळात या रस्ते व उड्डाणपूलांच्या देखभालासाठी आणि कंत्राटदाराला जबाबदार धरण्यात महानगरपालिकेला अनेक अडचणी येत असल्याची बाब माहे फेब्रुवारी,२०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत विविध विभागांकडून बांधण्यात येत असलेल्या रस्ते व उड्डाणपुलांचे परिपूर्ण व सर्व अधिकारांसह हस्तांतरण बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे करण्याबाबत शासनाने धोरण तयार केले आहे काय,
(३) असल्यास, सदरहू धोरणाचे थोडक्यात स्वरूप काय आहे व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१८) :**(१) अशी बाब महानगरपालिकेच्या निदर्शनास आलेली नाही. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अभियांत्रिकी विभागामार्फत बांधकाम केलेल्या रस्ते व पुलांचे हस्तांतरीकरण मुंबई महानगरपालिकेस सन २०१५ पर्यंत योग्य रित्या करण्यात आलेले आहे. एम.एस.आर.डी.सी किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे पूल हस्तांतरीत करण्यात आलेले नाहीत.
(२), (३) व (४) सध्याच्या प्रचलीत कार्यपध्दतीवरुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मुंबई महानगरपालिका यांनी संयुक्तीक रित्या रस्ते व पुल हस्तांतरित करण्यात आले. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून रस्ते व उड्डाणपूल पूर्ण केल्यानंतर खालीलप्रमाणे अंमलबजावणी करण्यात येते :

१) हस्तांतरणबाबतचे विनंती पत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेस पाठविण्यात येते.

२) स्वतंत्र बैठक घेऊन त्यानंतर रस्ते व उड्डाणपूलांची पाहणी करण्यात येते. त्यानंतर महानगरपालिकेच्या अभियंत्यांच्या शंकांचे निरसन प्राधिकरणाकडून करण्यात येते.

३) हस्तांतरण करुन घेतलेल्या पावतीसह खालील कागदपत्रे देण्यात येतात :

अ) बांधकामाचे नकाशे (As built drawing).

ब) सबंधित अधिकारी, कंत्राटदार व प्रकल्प सल्लागार यांचा तपशील.

क) दोष दायित्व कालावधीमध्ये निवारणाकरीता रोखून ठेवलेले कामगिरी ठेव (Performance Security) व धारणा ठेव (Retention Money) यांचे हस्तांतरण. सदर रकमेचा संबंधित कंत्राटदारास परतावा कंत्राटाच्या तरतूदी नुसार मुंबई महानगर पालिकेकडून करण्यात येतो.

ख) दोष दायित्व कालावधीमध्ये कंत्राटदाराची जबाबदारी असलेल्या बाबींची दोष निवरण करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या नावाने प्राधिकृत पत्र. याव्यतिरिक्त काही समस्या उद्भवल्यास महानगरपालिकेच्या विनंतीनुसार प्राधिकरणाकडील अभियंते तांत्रिक बाबीवर चर्चा करण्यासाठी उपलब्ध असतात.

---

## नाशिक जिल्ह्यातील विविध नगरपरिषदांमधील कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू करणेबाबत

**(४८) ११६३०० (१२-०४-२०१८). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील विविध नगरपरिषदामध्ये जिल्हाधिकारी,नाशिक यांनी माहे मे २०१३ पासून महाराष्ट्र राज्य स्तरीय नगरपरिषद संवर्ग पदांच्या अभियांत्रिकी (स्थापत्य, जलदाय, संगणक, विद्युत) तसेच लेखापाल, लेखापरीक्षक या पदावर कर्मचारी नियुक्त केलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कर्मचाऱ्यांना दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर सरळ सेवेने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना लागू असलेली नवीन परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना नियुक्ती प्राधिकारी या नात्याने जिल्हाधिकारी, नाशिक यांचेमार्फत अद्यापही लागू केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी सदर कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू करणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) होय.

(२) नाशिक जिल्हयातील काही नगरपरिषदांनी कर्मचाऱ्यांच्या वेतनातून अंशदान कपात करुन स्वतंत्र खात्यात ठेवलेले आहेत. तथपि नगरपरिषदांमधील कर्मचाऱ्यांना नविन परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याच्या दृष्टीने संबंधित कर्मचाऱ्यांचे खाते क्रमांक व लेखाशिर्ष अद्याप उपलब्ध नसल्याने योजना लागू करण्यात आलेली नाही असे जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांनी कळविले आहे.

(३) होय.

(४) शासन निर्णय, दि.०७.०३.२०१७ अन्वये संवर्ग कर्मचाऱ्यांचे नियुक्ती प्राधिकारी म्हणून आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना घोषित केले असल्याने कर्मचाऱ्यांना नविन परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याच्या दृष्टीने संबंधित कर्मचाऱ्यांचे खाते क्रमांक व लेखाशिर्ष उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु केलेली असल्याचे नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लोअर परळ (मुंबई) येथील मुर्गीवाला चाळ १/२ ना. म. जोशी मार्ग पुनर्विकासात विकासक मे. ऑर्बिट कॉर्पोरेशन यांनी रहिवाशांची केलेली फसवणूक

**(४९) ११६३६५ (०३-०४-२०१८). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोअर परळ (मुंबई) येथील मुर्गीवाला चाळ १/२ ना. म. जोशी मार्ग येथील पुनर्विकासात विकासक मे. ऑर्बिट कॉर्पोरेशन यांना सन २००९ मध्ये वि. नि. नि. ३३(७) अंतर्गत ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते सदर पुनर्विकासाचे काम गत २ ते ३ वर्षापासून बंद असल्याच्या तक्रारी रहिवाशांनी शासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाकडून भाडेकरूंना पर्यायी जागेसाठी भाडे देऊन इमारत रिकामी करण्यात आली होती परंतु गत २ ते ३ वर्षापासून पर्यायी जागेसाठी देण्यात येणारे भाडेही बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुसार सदर उक्त काम पूर्ण करण्याकरिता विकासकाविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०६-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) याबाबत मा. मंत्री (उद्योग) तथा पालक मंत्री, मुंबई शहर यांच्या दि.०९.०५.२०१६ रोजीच्या पत्रानुसार व मा. राज्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार दि.२३.०५.२०१६ रोजी भाडेकरु/ रहिवाशी, विकासक व दुरुस्ती मंडळाच्या अधिकाऱ्यासोबत झालेल्या संयुक्त बैठकीत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने माहिम आणि दादर येथील विकासकाने बंद ठेवलेल्या किंवा अर्धवट अवस्थेत ठेवलेल्या पुनर्विकास प्रकल्पांवर धोरण निश्चित करण्याबाबत शासनाकडे परिपूर्ण प्रस्ताव दि.०२.११.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे. सदर

प्रस्तावामध्ये ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करुन म्हाडाने म्हाड अधिनियम १९७६ प्रकरण ५ कलम ४१ मधिल तरतुदीनुसार भूसंपादित करुन, उर्वरित काम पूर्ण करण्याची तरतुद प्रस्तावित केलेली आहे. सदरचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

विकासक व भाडेकरु / रहिवाशी यांची म्हाडाच्या स्तरावर संयुक्त बैठक दि.०६.१०.२०१७ रोजी घेण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये विकासकांनी असे सांगितले की, मा.उच्च न्यायालयाने त्यांची सर्व बँक खाती गोठीत केली असल्याने, सध्या भाडेकरु / रहिवाशांना तात्पुरत्या पर्यायी व्यवस्थेचे भाडे देऊ शकत नाहीत. तसेच पुनर्विकासाचे कामही सुरु करु शकत नाहीत. सध्या नॅशनल कौन्सिल लॉ ट्रिब्युनल (NCLT) यांचेकडे प्रकरण दाखल आहे. नॅशनल कौन्सिल लॉ ट्रिब्युनल (NCLT) यांच्या परवानगीशिवाय ते कोणताही खर्च करु शकत नाहीत. भाडेकरु / रहिवाश्यांना तात्पुरत्या पर्यायी जागेचे भाडे देणे शक्य व्हावे याकरिता ते त्यांची मालमत्ता विकण्यास परवानगी देणेबाबत मा.उच्च न्यायालयात लवकरच विनंती करणार आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिसगाव (कल्याण (पूर्व)) येथील महावितरण कंपनी कार्यालयात वरिष्ठ तंत्रज्ञ यांनी कर्तव्यात टाळाटाळ केल्याबाबत**

**(५०) ११६४८९ (१८-०४-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिसगाव, कल्याण (पूर्व) येथील महावितरण कंपनीत वरिष्ठ तंत्रज्ञ श्री. इश्वर साहेबराव सोनावने हे सन २०१५ चे गणेशोत्सव उत्सवाच्या दिनांक १९/९/२०१५ ते २७/९/२०१५ या काळात वरिष्ठ अधिकाऱ्याने निर्धारित केलेल्या कामाच्या वेळेत गैरहजर राहिल्याने जनतेस रात्रीच्या वेळेस नाहक त्रास सहन करावा लागल्याने वरिष्ठांनी श्री.सोनावणे यांचे वेतन कपात करुन शिस्तभंगाची कार्यवाही करण्याच्या शिफारशीनुसार त्यांचेवर कार्यवाही करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.सोनावणे यांचेवर केलेल्या कार्यवाहीत त्यांना रुपये ५१,०००/- इतका दंड ठोठावण्यात आला असून वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार करुन ठोठावण्यात आलेला दंड माफ करण्यात येऊन त्यांचे गैरहजेरीच्या काळातील वेतन श्री. सोनावणे यांना परत करण्याची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत तसेच ग्राहकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने श्री.सोनावणे यांचे विरुध्द स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० जून, २०१६ व १४ जुलै, २०१६ रोजी अधिक्षक अभियंता, कल्याण यांचेकडे लेखी तक्रारी केल्या आहेत तसेच वरिष्ठ अधिकारी यांना मारहाण करणे व धमकावणे याबबत श्री.सोनावणे यांचेविरुद कोळसेवाडी, पोलीस स्टेशन येथे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी तक्रार दाखल करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कर्तव्यात कसूर करणारे श्री.सोनावणे, वरिष्ठ तंत्रज्ञ यांचेवर तसेच त्यांना मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे. वरिष्ठ तंत्रज्ञ श्री.ईश्वर साहेबराव सोनावणे हे दि.०३.०९.२०१५ ते दि. ०४.०९.२०१५ या कालावधीत नियंत्रण अधिकाऱ्यांस पूर्व सूचना न देता कामावर गैरहजर होते. तसेच त्यांना दि. १७.०९.२०१५ ते दि.२७.०९.२०१५ या कालावधीत गणेशोत्सव व ईद या उत्सवाच्या काळात वीज पुरवठा सुरळीत व अखंडीत राहण्यासाठी वेगळे कामाचे आदेशपत्र नियंत्रण अधिकारी यांनी तयार करुन तातडीचे काम करण्याचे आदेश दिले होते. परंतु, श्री.सोनावणे यांनी आदेशाचे उल्लंघन केले. याकरिता नियंत्रण अधिकारी यांनी दिलेले गोपनीय पत्र श्री. सोनावणे यांनी फाडून नियंत्रण अधिकाऱ्यांवर फेकले आणि धमकी देऊन अरेरावी भाषा वापरली, अशी अतिरिक्त कार्यकारी कल्याण (पूर्व) उप विभाग क्र.१ यांची तक्रार असल्याने कार्यकारी अभियंता, कल्याण (पूर्व) विभाग यांच्या दि. १६.०३.२०१६ च्या पत्रान्वये श्री. सोनावणे यांना आरोपपत्र देण्यात आले. सदर गैरहजर कालावधीचे वेतन श्री.सोनावणे यांना अदा करण्यात आलेले नाही.

(२) होय, हे खरे नाही. उपरोक्त प्रकरणाबाबत श्री. सोनावणे, वरिष्ठ तंत्रज्ञ यांची त्यांच्यावर दाखल केलेल्या आरोपपत्रांच्या अनुषंगाने दि. २७.०५.२०१६ रोजी चौकशी अधिकाऱ्यांमार्फत चौकशी पूर्ण करण्यात आली. चौकशी अधिकाऱ्यांनी आपला चौकशी अहवाल दि. १६.०८.२०१६ रोजी कल्याण (पूर्व) विभागात सादर केल्यानंतर सदर विभागाच्या दि. २४.०८.२०१६ च्या पत्रान्वये अंतिम शिक्षा आदेश निर्गमित करण्यात आला व श्री. सोनावणे यांच्या एकूण स्थूल वेतनाच्या १/३ इतकी रक्कम दंड म्हणुन वसूल करण्यास कळविले. त्यानुषंगाने सदर शिक्षेसंदर्भात ठोठावण्यात आलेल्या दंडाची रक्कम रु. १८२५०/- श्री. सोनावणे यांच्या माहे सप्टेंबर, २०१६ च्या वेतनाद्वारे वसुल करण्यात आली. त्यानंतर श्री. सोनावणे यांनी उपरोक्त प्रकरणी अधिक्षक अभियंता, कल्याण मंडल-१ येथे प्रथम अपिल सादर केले. प्रथम अपिलात सक्षम अधिकारी,कल्याण मंडल-१ यांनी त्यांच्या दि. ०४.१०.२०१७ च्या पत्रान्वये उपरोक्त शिक्षेत बदल करुन "सक्त ताकिद" ही शिक्षा निर्णयांकित केली.

(३) अंशत: खरे आहे. वरिष्ठ अधिकारी यांना धमकावणे व मारहाण करणे याबाबत श्री. सोनावणे यांचे नियंत्रण अधिकारी, तत्कालिन सहाय्यक अभियंता, तिसगाव शाखा यांनी कोळशेवाडी पोलीस स्टेशन येथे दि. १६.१०.२०१५ रोजी श्री. सोनावणे यांच्याविरुध्द अदखल पात्र गुन्ह्याची नोंद केली आहे.

(४), (५) व (६) सदर प्रकरणी कारवाई करण्यास महावितरण सक्षम असल्यामुळे शासनामार्फत चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**           **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.**            **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.